# नोटीस बोर्ड

जाक्र/जिपहिं/राग्रास्वअ/93 /2026
ग्रामपंचायत विभाग,जि.प.हिंगोली
दिनांक : 20/04/2026

प्रति,
श्री / श्रीमती ------------------------------------
सनदी लेखापाल

विषय : सन 2025-26 या आर्थीक वर्षाच्या लेखापरिक्षणाकरीता सनदी लेखापाल यांनी दरपत्रके सादर करणेबाबत.

संदर्भ : 1) मा. संचालक, पंचायत राज महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जाक्र/राग्रास्वअ/641/2026-27 दिनांक 06/04/2026

2) मा. मु.का.अ. यांचे टिपणी क्र 246 च्या मान्यतेनुसार

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान अंतर्गत सन 2025-26 या आर्थीक वर्षात सदर योजनेअंतर्गत विविध बाबींवर झालेल्या खर्चाचे लेखापरिक्षण करावयाचे आहे. सदर योजनेअंतर्गत सन 2025-26 या आर्थीक वर्षात अंदाजे रु 74.46 लक्ष एवढा खर्च झालेला आहे.

त्यानुसार आपण सदर लेखापरिक्षणाकरीता आकारण्यात येणाऱ्या लेखापरिक्षण शुल्क (सर्व करांसहीत) बाबत दरपत्रक या कार्यालयास दिनांक 27/04/2026 पर्यंत सादर करावेत.

तसेच आपले लेखापरिक्षण शुल्काबाबत दरपत्रक बंद लिफाफ्यामध्ये दिनांक 27/04/2026 रोजी दु 4.00 वा. पर्यंत या कार्यालयाकडे सादर करावीत. उशिराने प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाहीत. प्राप्त झालेले दरपत्रक दिनांक 28/04/2026 रोजी सकाळी 11.00 वा. माझे दालनात उघडण्यात येतील. ज्या सनदी लेखापालाचे लेखापरिक्षण शुल्क इतरांच्या तुलनेत सर्वात कमी असतील त्यांना लेखापरिक्षणासाठी आदेश देण्यात येईल.

**अटी व शर्ती :-**

1) नियुक्ती आदेशात देण्यात येणाऱ्या सर्व अटि व शर्ती बंधनकारक राहतील.
2) सदर नियुक्ती कोणत्याही कारणी रद्द करण्याचे सर्व अधिकारी मा. मु.का.अ. जि.प.हिंगोली यांना राहतील.

**(के. एल. गड्डापोड)**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)**
**जिल्हा परिषद, हिंगोली**

Scanned with OKEN Scanner